# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - १०
## सभावृत्तांत

दिनांक - ७/१/२०१९ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.७/१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.भोसले सचिन सुरेश
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०. मा.चंद्रकांत बारकु नखाते
११. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१२. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीम.स्मिता गंगाराम झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.ए.के.सुपे - लेखाधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य),श्री.व्ही.बी.ओहोळ, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.डी.सुर्यवंशी - कनिष्ठ अभियंता, श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,जलनि:सारण, श्री.मगर एस एम –कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल

आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.जे व्ही पटेल – सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.जी एन खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.बी के तापकिर – उद्यान सहाय्यक, इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ५/१२/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्र. ९) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - १

दिनांक- ७/०१/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

**संदर्भ – मा.** निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्र..

मा.निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर पिंपरी या ठिकाणी संतोषी माता मंदीरामागे सार्वजनिक वाचनालय बांधणेत यावे, तरी सदर जागा हि पालिकेच्या मालकिची असुन त्या ठिकाणी वाचनालय व समोरील बाजुस सिमेंट काँक्रिटीकरण करुन देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सदर विषयाबाबत स्थापत्य विभागामार्फत जागेची पाहणी करुन निर्णय घेणेत यावा)

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - २

दिनांक- ७/०१/२०१९

सूचक- मा.मनिषा पवार अनुमोदक- मा.अर्चना बारणे

**संदर्भ – मा.** क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे पत्र क्र.गक्षेका/प्रशा/६/कावि/ ०४ /२०१८ दि. ०२/०१/२०१८

मा.क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे पत्र क्र.गक्षेका/प्रशा/६/कावि/ ०४ /२०१८ दि. ०२/०१/२०१८ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका "ग" क्षेत्रिय कार्यालय दिनांक ०९/०८/२०१७ पासुन नव्याने कार्यान्वित झालेले असुन नविन प्रभाग रचनेनुसार "ड" क्षेत्रिय कार्यालयाकडुन प्रभाग क्र २१ व २७ तसेच "ब" क्षेत्रिय कार्यालयाकडुन प्रभाग क्र २३ व २४ असे प्रभाग मिळुन "ग" क्षेत्रिय कार्यालयाची निर्मिती झाली असुन या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र २१,२३,२४,२७ या प्रभागांचा समावेश करण्यात आलेला आहे. उपरोक्त विषयान्वये मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दि २९/१२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, मा.आयुक्त साहेब यांचे सुचने नुसार मनपा कार्यक्षेत्रातील शहर फेरीवाला धोरणातंर्गत हॉकर्स झोन निश्चिती तसेच नो हॉकर्स निश्चित करून सदर रस्त्याची नावे ,ठिकाणे घोषित करणेबाबत सुचविणेत आलेले आहेत.

| अ.क्र | **निश्चित हॉकर्स झोन ठिकाणे** |
|---|---|
| ०१ | पॉवर हाऊस चौक ,नवमहाराष्ट्र शाळे समोर पिंपरी (वार्ड क्र २१) |
| ०२ | तपोवन मंदिर रस्त्याजवळील भाजी मंडई(वार्ड क्र २१) |
| ०३ | आझाद मित्र मंडळ चौक (वार्ड क्र २७) |

| | |
|---|---|
| ०४ | कुणाल हॉटेल ते नखाते (साईप्रितम नगरी) (वार्ड क्र २७) |
| ०५ | रहाटणी फाटा(वार्ड क्र २७) |
| ०६ | श्रीनाथ हौ(डावी बाजु) जवळिल रस्ता.सोसा. (वार्ड क्र २३) |
| ०७ | श्रीनाथ हौ(उजवी बाजु) जवळिल रस्ता.सोसा. (वार्ड क्र २३) |
| ०८ | हनुमान जिम शेजारी थेरगाव गावठाण रस्ता(वार्ड क्र २४) |
| ०९ | शिवकॉलनी कमान शेजारी वाकड रस्ता(वार्ड क्र २४) |
| १० | मनपा मैदाना जवळ थेरगाव गावठाण रस्ता २२न .(वार्ड क्र २४) |
| ११ | खिंवसरा मनपा शाळा ते वाकड रस्ता. ( रद्द - कोर्टाच्या निर्देशानुसार ) (वार्ड क्र २४) |

| अ.क्र | नो हॉकर्स झोन ठिकाणे |
|---|---|
| ०१ | काळेवाडी फाटा ते डांगे चौक संपुर्ण बी.आर.टी रोड (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०२ | काळेवाडी फाटा ते तापकीर चौक संपुर्ण बी.आर.टी रोड (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०३ | तापकीर चौक ते डी मार्ट चौक संपुर्ण बी.आर.टी रोड. (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०४ | डांगे चौक ते बिर्ला हॉस्पिटल चौक संपुर्ण रोड (दवाखाना आणि २४ मीटर रोड असले कारणामुळे) |
| ०५ | डांगे चौक येथील बाळकृष्ण मंगल कार्यालयाकडुन थेरगाव गावठाणाकडे येणारा रस्ता कॉर्नर.(दवाखाना आणि २४ मीटर रोड असले कारणामुळे) |
| ०६ | खिंवसरा मनपा शाळा ते वाकड रस्ता.(कोर्टाच्या निर्देशानुसार ) |
| ०७ | साई चौक पिंपरी ते जायका चहा चौक पिंपरी (जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ०८ | रिव्हर रोड पिंपरी कडे येणारा रस्ता. ( जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ०९ | कराची चौक ते जिजामाता चौक ते जयहिंद शाळा रोड ते जमतानी चौक पिपंरी रस्ता. (कोर्टाच्या निर्देशानुसार ) |
| १० | अशोक थिएटर चौक पिंपरी .( जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ११ | नवमहाराष्ट्र शाळेसमोरील रस्ता पिंपरी . (कोर्टाच्या निर्देशानुसार ) |

उपरोक्त हॉकर्स ठिकाणांना मान्यता देणेकामी, नगररचना विभाग,कार्यकारी अभियंता स्थापत्य,भुमि जिंदगी विभाग या विभागाच्या अधिका-यांशी चर्चा करणेकामी स्वतंत्र मिटींग आयोजित केली जाईल तोपर्यंत निश्चीत हॉकर्स झोन ठिकाणांना मान्यता देणेबाबतचा विषय तहकुब ठेवणेत येऊन नो हॉकर्स झोन ठिकाणे मंजुर करुन सदरचे विषयास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे**

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ३

दिनांक- ७/०१/२०१९

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ७/०१/२०१९ चे पत्र

मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ७/०१/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२७ रहाटणी येथील असणा-या शिवराज नगर भागामध्ये साई मिरॅकल सोसायटी कडे जाणा-या व बाळासाहेब पंडीत नखाते यांच्या घराकडे जाणा-या कॉलनीला अद्याप कोणतेही नाव देणेत आलेले नाही तरी अनुक्रमे रुखमिणी कॉलनी व

नामदेव कॉलनी असे नाव देणेत यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ४

दिनांक- ७/०१/२०१९

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ७/०१/२०१९ चे पत्र

मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ७/०१/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२७ रहाटणी येथील नखाते वस्ती येथील चौकास आज पर्यंत कोणतेही नाव देणेत आलेले नाही, तरी नखाते वस्ती चौकास अधिकृत नखाते वस्ती असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ५

दिनांक- ७/०१/२०१९

सूचक- मा.मनिषा पवार अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अध्यक्ष ग प्रभाग समिती यांचे दि.०७/०१/२०१९ चे पत्र

प्रभाग क्र.२३ थेरगाव गावठाण येथे गतवर्षीप्रमाणे प्रजासत्ताक दिन साजरा करावयाचा आहे. सदर कार्यक्रमांतर्गत माध्यमिक व प्राथमिक शाळांच्या मुलांची रॅली काढावयाची आहे. तसेच तापकीर चौक ते रोजवुड हॉटेल रस्त्यावर ठिकठिकाणी स्टेजवर शाळेच्या मुलांतर्फे नाटकाचे सादरीकरण करावयाचे आहे. तसेच श्री शिवाजी महाराज अर्धपुतळयाजवळ मोठा स्टेज व Sound System ची व्यवस्था करुन तेथे कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे. त्याअनुषंगाने संबंधित विभागांना कार्यक्रम करणे व व्यवस्था करणेकामी आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**दि. ७/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मा.अध्यक्ष श्री.बाबासाहेब त्रिभुवन यांचे अनुमतीने सभेस सुरुवात करण्यात आली.

## स्थापत्य विभाग

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर पिंपरी या ठिकाणची जागा पालिकेची आहे किंवा कसे याबाबत स्थापत्य विभागामार्फत पाहणी करावी.

**श्री.देवन्ना गट्टुवार (कार्यकारी अभियंता, स्थापत्य)** - सदरची जागा हि झोपडपट्टी क्षेत्र म्हणुन घोषीत आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** झोनिपु विभागाकडुन माहिती घेऊन पुढील सभेमध्ये सादर करण्यात यावी.

**मा.निकीता कदम** – सदर जागा एवढी मोठी नाही, तेथे वाचनालय केल्यास उपयोग होईल.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** पुढील सभेपर्यंत सदर जागेबाबत माहिती घेणेत यावी.

**भूमि जिंदगी विभाग**

**मा.निलेश बारणे –**निश्चीत हॉकर्स झोन पाहता शिव कॉलनी रोड हा छोटा आहे, असे असतांना येथे हॉकर्स झोन कुठल्या आधारावर व कसे निश्चीत करण्यात आले. सर्व्हे क्र.२२ मध्ये बॅडमिंटन कोर्ट, छान जॉगिंग ट्रॅक आहे. साडे तीन कोटीचा हा प्राजेक्ट आहे, असे असतांना सदर भागात हॉकर्स झोन झाल्यास विद्रुपीकरण होईल.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** प्रस्तावात नमुद निश्चीत हॉकर्स झोन हे मनपा कार्यक्षेत्रातील शहर फेरीवाला समितीने निश्चीत केले आहे. उपअभियंता, नगररचना विभाग, कार्यकारी अभियंता स्थापत्य, वाहतुक समिती यांनी पाहणी करुन, ट्रॅफिकचा विचार करुन ठिकाणे निश्चीत केलेले आहे.

**मा.सचिन भोसले** – हॉकर्स झोनला आमचा विरोध नाही परंतु तेथील रस्त्यांचा विचार व्हावा.

**मा.चंद्रकांत नखाते** – समितीने याबाबत नगरसदस्यांना विचारायला हवे होते.

**मा.निलेश बारणे** – सदर विषयाबाबत निश्चीत हॉकर्स झोनला आमचा विरोध असुन नो हॉकर्स झोन मान्य करण्यात यावे. ज्या ठिकाणी हॉकर्स साठी जागा असुन व्यवसाय सुरु आहेत, त्या ठिकाणी नो हॉकर्स झोन करण्यात आला आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** सुप्रिम कोर्टाच्या मान्यतेने नो हॉकर्स झोन निश्चीत करण्यात आले आहेत. शाळा, हॉस्पिटल, मुख्य चौक पासुन १०० मीटर ते १५० मीटर अंतरावर हॉकर्स झोन करायचा नाही असे कोर्टाचे आदेश आहेत.

**मा.संदिप गाडे –** सदर विषय मंजुर करतांना कोर्टाच्या आदेशानुसार मंजुर करावा.

**मा.सचिन भोसले** – सदर विषयाबाबत अभ्यास करुन मंजुर करु. स्थापत्य व नगररचना विभागाशी चर्चा करण्यात यावी.

## अतिक्रमण विभाग

**मा.चंद्रकांत नखाते –** अतिक्रमण विभागातील अतिक्रमण कारवाई करीता असलेल्या गाडयांना माईक सिस्टीम बसविण्याबाबत काय झाले.

**श्री.सरवदे (अतिक्रमण विभाग)** – याबाबत मा.कार्यकारी अभियंता अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभाग यांना सांगण्यात आले आहे.

**आकाशचिन्ह परवाना विभाग**

**मा.अर्चना बारणे -** प्रभाग समिती मासिक सभेमध्ये मान्य झालेल्या ठरावानुसार प्रभाग क्र.२३ मधील स्ट्रीट लाईट पोलवर जास्त प्रमाणात अनाधिकृत फ्लेक्स, जाहिराती याबाबत कारवाई करण्यात आलेली नाही याबाबत माहिती द्यावी. यापुर्वीच्या मासिक सभेमध्ये सदर ठराव मंजुर झाला असुनही अद्याप काम झालेले नाही, असे असल्यास ठराव मंजुर करुनही काम होत नसेल तर पुढील सभेस आम्ही हजर राहणार नाही.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** सदर ठराव हा आकाश चिन्ह परवाना विभागाकडे फॉरवर्ड करण्यात येईल. प्रभाग समितीस याबाबत अधिकार दिलेले नाही.

**मा.संदिप गाडे** – प्रभाग क्र.२३ व २४ मध्ये जी अमृत योजनेची कामे चालली आहेत, तेथे राडारोडा उचलला जात नाही, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तेथील राडारोडा उचलण्यात यावा, ज्यामुळे वाहतुक सुलभ होईल.

**श्री.पी.पी.पाटील** (कार्यकारी अभियंता,जलनि:सारण)- सदर काम लवकरात लवकर करण्यात येईल.

## आरोग्य विभाग

**मा.सचिन भोसले -** जलपर्णीचे काम कोण करते.  कितीचे टेंडर आहे.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** रोटरी क्लबव्दारे प्रत्येक रविवारी हायसिंथ काढणेचे काम करण्यात येते.  हायसिंथ उचलणेचे काम मनपा मार्फत केले जाते.  सध्या ज्या ठेकेदाराला हायसिंथ काढण्याचे काम दिलेय, त्याने अद्याप काम चालु केलेले नाही.

**मा.चंद्रकांत नखाते -** संपुर्ण ग प्रभागात सफाई पथकाच्या तक्रारी आहेत.  मुकादमचा नंबर दिला का?

**मा.सचिन भोसले -** औषध फवारणीच्या कामाचे काय झाले?

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** मुकादम व आरोग्य निरीक्षकांच्या नावाचे बोर्ड तयार करुन चौकात लावणेत आलेले आहेत.  उदा.डांगे चौक, गंगवा चौक इ.

## जलनि:सारण विभाग

**मा.संदिप गाडे -** ड्रेनेज विभागाचे काम वेळेवर होत नाही.

**मा.सचिन भोसले –** सक्शनची गाडी येत नाही, त्यामुळे तक्रारी येतात., धायजे विद्यालय समोर गाडया पुरवायचे टेंडर आहे का?  गाडी कधीच वेळेत येत नाही.

**मा.कैलास बारणे –** सक्शनच्या गाडीचे मीटरचे रिडींग घ्या.

**मा.संदिप गाडे -** प्रभाग क्र.२३ व २४ मध्ये किती वेळा सक्शनच्या गाडया आल्या याबाबत माहिती द्या. BRT मेन रोड, जनरीश कॉलनी, शिव कॉलनी येथे गाडया पाठवा.

## पशुवैद्यकिय विभाग

**मा.सचिन भोसले -** पशुवैद्यकिय विभागाचे टेंडर झाले का?  कुत्र्यांची संख्या वाढली आहे.  नसबंदी किती केली जाते?

**मा.संदिप गाडे -** नसबंदी केल्यानंतर कुत्रे कुठे सोडले जातात  याबाबत माहिती द्या.

**श्री.डी.एम. कोटीयाना (आरोग्य निरीक्षक, पशुवैद्यकिय विभाग) –** डुकरांचे व कुत्र्यांचे टेंडर प्रोसेस मध्ये आहे यापुर्वी जी संस्था काम करत होती त्या संस्थेस मुदतवाढ देण्यात आली आहे. १ दिवसात २० ते २५ नसबंदी ऑपरेशन केले जातात, कुत्र्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात येऊन, ज्या ठिकाणाहुन त्यांना उचलण्यात येते तेथेच पुन्हा सोडण्यात येते.

**पाणीपुरवठा विभाग**

**मा.चंद्रकांत नखाते –** तांबे शाळा परिसर या भागात पाणी नाहीये.

**श्री.सी.एच.कुंभार(कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा) –** रोहित पाम येथील चोक अप काढणेत येईल. अमृत योजनेव्दारे काम झाले की सदर ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत होईल.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१९
दिनांक - /०१/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही